**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
*Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com*
UGC Approved Sr. No.48612, DEC-JAN 2018, VOL- 5/25

# सामाजिक चळवळींचे बदलते स्वरूप आणि आव्हाने

**प्रा. खोकले.डी. एल.**

*राज्यशास्त्र विभाग, मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य (स्वायत्त), शिवाजीनगर, पुणे- ५.*

**Abstract**

*राजकीय समाज शास्त्रांमध्ये सामाजिक चळवळींची भूमिका महत्वाची आहे. आधुनिक राजकारणात साधारणतः २० व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच या सामाजिक चळवळींनी राजकीय प्रक्रियेचा अवकाश व्यापण्यास सुरुवात केलेली दिसून येते. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच युरोपियन राजकारण्यांच्या भाषणांमधून* 'Social Movement' *हा शब्द अगदी चलनी नाण्यांप्रमाणे वापरला गेला. मोठ्या प्रमाणावरचा स्थित्यंतराचा हा काळ होता. नवीन समाज रचना अस्तित्वात आणण्यासाठी, धेय्य धोरणे आणि आर्थिक गणिते बदलणे हे त्यांच्या कामाचे स्वरूप होते.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

1. **भारतातील सामाजिक-राजकीय चळवळींच्या उदयाच्या पार्श्वभूमीचा आढावा घेणे.**
2. **भारतातील सामाजिक-राजकीय चळवळींचे बदलते स्वरूपयाचा मागोवा घेणे.**
3. **भारतातील सामाजिक-राजकीय चळवळींसमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.**

**माहिती संकलन:**

**शोधनिबंध लिहताना माहिती संकलित करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर केला आहे. ज्यात विविध तज्ञाचे लेख, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके आणि इंटरनेट याचा समावेश होतो.**

**भारतीय राजकारणात सामाजिक-राजकीय चळवळींचा उदय आणि स्थिरीकरण-**

**भारत स्वतंत्र झाल्यानंतर सुरुवातीच्या काळात देशात सामाजिक, राजकीय व इतर ही क्षेत्रातील चळवळी फारच कमी प्रमाणात होत्या. भाषा वार प्रांतरचनेच्या चळवळींचा अपवाद वगळता इतर चळवळींचा उल्लेख अल्प प्रमाणात दिसून येतो. परंतु, सत्तर – ऐंशीच्या दशकात जेंव्हा**

**संस्थात्मक राजकारणालातडे जाऊ लागले, राजकीय पक्ष सत्ताप्राप्तीसाठी सैरभैर झाले तेंव्हा या सत्ता स्पर्धेमुळे सामान्य जनतेचे सामाजिक, आर्थिक प्रश्न मागे पडू लागले. सामान्य जनतेचे नेतृत्व हे स्वार्थी राजकीय पक्ष करतील अशी शाश्वती राहिली नाही. तेंव्हा हे सामान्य जनतेचे असामान्य प्रश्न घेऊन भारतामध्ये हळू-हळू सामाजिक-राजकीय चळवळी जोर धरू लागल्या. त्यासाठी खाजगीकरण - उदारीकरण –जागतिकीकरण हे धोरणही तेवढ्याच प्रमाणात कारणीभूत ठरले.**

**समाजातील सार्वजनिक अस्वस्थता या चळवळींमधून प्रतिबिंबित होऊ लागली. राजकीय किंवा सामाजिक परिवर्तनाच्या आकांक्षेतून, लोकांच्या असंथात्मक स्वरूपाच्या संघटित कृतींमधून या चळवळी आकाराला येऊ लागल्या. या चळवळी मग लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी असोत किंवा शेतकरी, कामगार वा आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी असोत; त्या लोकांमध्ये नव्या अशा रुजवू लागल्या. लोकशाहीला नवा अर्थप्राप्त करून देण्यास या चळवळी हातभार लावू लागल्या. राज्य, राजकीय पक्ष यापलीकडे जात लोकांना संघटित होण्यासाठीचा अवकाश या चळवळींनी पुरविला आहे. यामध्ये शेतकरी चळवळी, कामगार चळवळी, स्त्री वादी चळवळी अशा चळवळींचा उल्लेख करणे अनिवार्य ठरते. पुढे यात पर्यावरणवादी चळवळ, ओबीसी चळवळ, विस्थापितांची चळवळ आदींनी भर घातली.**

**सामाजिकचळवळींपुढीलआव्हाने:-**

**लोकाश्रयाचेआव्हान -**

**१९९१ च्या आर्थिक मांडणीत जे काही परिणाम दिसतात त्यात समाज आत्मकेंद्री होणे हा एक ठळक 'साईड इफेक्ट' दिसतो. जन-आंदोलने मुख्यत: जनाधारावर चालवावी लागतात आणि आता हा आधार झपाट्याने कमी होत आहे. ठराविक हितसंबंधावर आधारित आंदोलनाला तरी त्या त्या लोकांचा स्वार्थ असतो म्हणून जनाधार मिळतो. उदाहरणार्थ धरणात ज्यांची जमीन जाणार असते ते लोक संघटित होऊन आंदोलन चालवतात, त्याला तेवढा मर्यादित जनाधार मिळतो.**

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

मात्र तोच आधारधोरण विषयक (पॉलिसीबेस्ड) आंदोलनांना मिळेल असे नाही. धरणांचेच उदाहरण पुढे न्यायचे तर माझी जमीन जात असेल तर मी त्या आंदोलनात सहभागी होईन मात्र हे अन्यत्र होऊ नये म्हणून भूसंपादन कायद्यात योग्य बदल व्हावेत यासाठी होणाऱ्या आंदोलनात मी जाईनच याची शाश्वती नाही! 'जे सर्वांचेच असते ते कोणाचेच नसते' हा भारतात अन्यत्र लागू होणारा अलिखित नियम चळवळी-आंदोलनांनाही लागू होतो. एका जिल्ह्यात जमीन वाचवण्याचे आंदोलन चालू असेल तर शेजारच्या जिल्ह्याचे लोकदेखील या आंदोलनात सहभागी होत नाहीत कारण 'माझ्यावर वेळ येईन तेव्हा बघू' हे आपल्या समाजाचे सूत्र आहे आणि म्हणून व्यापक आंदोलनांचा जनाधार कमी कमी होतांना दिसतो आहे.

**काळाशी सुसंगत बौध्दिक मांडणी -**

खरे पाहता आता नव्यायुगाची रचना बघता निव्वळ राजकीय आणि सामाजिक नेतृत्व पुरेसे ठरणार नाही, त्या जोडीला बौध्दिक नेतृत्वाची देखील गरज आहे. गांधीजी किंवा आंबेडकर केवळ चळवळ म्हणून चळवळ चालवत नसत तर आनुषंगिक अशी समग्र वैचारिक, बौध्दिक मांडणी देखील करत असत. चळवळींचे प्रयोजन लोकानुनय किंवा लोकरंजन नसून श्रेयस-प्रेयसमधून श्रेयस निवडण्यासाठी समाज मनाची मशागत करणे हेही असते. त्यासाठी अनुनयी मांडणीची नाही, बुध्दिवादी मांडणीची गरज असते. आजकाल आंदोलनांमधून बुध्दिवाद गायब झाल्यासारखा दिसतो आहे. उदाहरणार्थ ऊसाला ३३००रुपये भाव मिळालाच पाहिजे असे शेतकऱ्यांच्या संघटना म्हणतात, हे ठीकच आहे. पण प्रत्येक गावात सरकारच्या कृपाळू धोरणाने चारचार दारूची दुकाने आणि इतर असंख्य खर्चाच्या वाटा निर्माण झालेल्या असतील तर ३३०० कायपण ३३००० भाव मिळाला तरी शेतकरी दारिद्र्यातच राहील. तेव्हा शेतीमालाच्या भावाची चळवळही शासनाचे दारूबाबत धोरण काय यावर गप्प बसू शकत नाही. ऊससाखरेसाठी किती आणि दारूसाठी किती याचा ही विचार शेतकऱ्यांच्या संघटनेने करणे भाग आहे. ऊस हे सर्वात जास्त पाणी घेणारे पीक असल्याने पर्यायी पिके घ्या हे शेतकऱ्यांना सांगणे हेही

संघटनेचे कर्तव्यच आहे मात्रते होतांना दिसत नाही. विसंगती तर इतकी दिसते ती गरीब शेतकऱ्यांचा हितासाठी बांधल्या गेलेल्या शेतकरी संघटनाक्रमाने श्रीमंत म्हणजे ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्याच हिताचे बोलतांना दिसतात आणि श्रीमंत शेतकऱ्यांच्या नको इतका अनुनय करतांना दिसतात. शरद जोशी यांनी केलेली समग्र बौध्दिक मांडणी आज होतांना दिसत नाही. गांधीजींचा आदर्श घेऊन चालणारी आंदोलने केवळ 'हटाव-बचाव' वादी असून उपयोगी नाही, त्यासाठी गांधीजींनी त्याकाळी केली तशी ('स्वदेशी'सारखी पण काल सुसंगत अशी नवी) आर्थिक मांडणी करावी लागेल. तशी मांडणी होण्यासाठी वैचारिक, बौध्दिक नेतृत्व विकसित करावे लागेल.

संघटीत दडपशाही -

राजकारणी-गुंड-कॉर्पोरेट-कंत्राटदार-नोकर शहा यांच्या युतीतून आंदोलनांना ना मोहरम करण्याचे सर्व प्रयत्न केले जातात. सत्तेतील राजकारणी आणि या भद्रयुतीतील मंडळींच्या हाती ज्या विपुल प्रमाणावर साधन संपत्ती (म्हणजे सत्ता, अधिकार, सरकी आर्थिक तरतूद, गाड्या-घोडे, खेड्यापर्यंत पोहोचलेली प्रशासन यंत्रणा, अमर्यादित कायदेशीर अधिकार इ. इ. ) उपलब्ध असते त्या मानाने आंदोलन किंवा चळवळीतील लोकांच्या हातात यापैकी कुठलीच साधन सामग्री नसते. हाताशी असलेली साधन सामग्री आणि मिळणारे यशयांचे गुणोत्तर प्रमाण काढल्यास असे लक्षात येईल की, लोकनिधीतून उभ्या राहणा-या आंदोलनांना असंख्य अडचणींना तोंड देत काम करावे लागते. तरीही त्यांची परिणामकारकता ही राजकारणातील नेतृत्वाच्या परिणामकारकते पेक्षा जास्तच आहे. सत्तेच्या लालदिव्याची मस्ती भारतात जागो जागी, वेळोवेळी झालेल्या संघटीत आंदोलनांनी आणि चळवळींनीच उतरवलेली आहे. मात्र नव्या काळात हे आव्हान दिवसेंदिवस प्रबळ होत आहे. चळवळी किंवा आंदोलनांचा या प्रचंड शक्तींपुढे निभावन लागण्याची अनेक उदाहरणे समोर येत आहेत. एकूण लोकशाहीलाच आव्हान मिळत

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

असतांना आंदोलनांनाही आव्हान मिळणार हे उघड आहे मात्र त्यातूनही सत्त्याचा विजय होईल या दुर्दम्य विश्वासावर चळवळी, आंदोलनेआजही उभी आहेत.

तसे पाहता चळवळींसमोर आज अनेक आव्हाने उभी आहेत आणि त्या आव्हानांकडे डोळस पणे पहावे लागेल, हे नक्की.

बदलत्या परिस्थितीला साद -

व्यवस्थेमधील त्रुटी निर्माण करणाऱ्या घटकांना बदलून व्यवस्था अधिक कार्यक्षम आणि प्रभावी करण्याच्या प्रयत्न या चळवळींमधून करण्यात आला. शोषित घटकांच्या प्रश्नांना ऐरणीवर आणण्याचा प्रयत्न संघटितपणे या चळवळींनी केला. यापैकी बऱ्याच चळवळींना बहुतांश प्रमाणात यश आले तर काहींना पाहिजे तेवढ्या प्रमाणात ते शक्य झाले नाही. अशा चळवळी काळाच्या पडद्यावर लुप्त झाल्या. तर काही चळवळींनी बदलत्या काळाबरोबर स्वतःमध्ये बदल करत आपले अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न केला. त्यात अलीकडच्या काळात चळवळींच रूपांतर एनजी ओमध्ये (सेवाभावी/ स्वयंसेवीसंस्था) झालं. चळवळीच्या पडत्या काळात भारतात सामाजिक/ सार्वजनिक व्यवहारामध्ये अशा प्रकारच्या सामाजिक संघटना उदयालाआल्या. चळवळींच्या मर्यादांमुळे निर्माण झालेली पोकळी त्यांनी भरून काढली. स्त्री – प्रश्नाच्या विविध गुंतागुंतीच्या बाजूपुढे आणणं, शासन व्यवहार अधिकाधिक लोकाभिमुख करण्याची गरज अधोरेखित करणं, याबरोबरच जमातवादी कृतींचा प्रतिकार करण्यावर आणि नागरिकांना शासन कारभाराची माहिती मिळविणे शक्य व्हावे, यावर अशा सेवाभावी संघटना भर देताना दिसतात.

अधिकाधिक आणि बदलता सहभाग व नवीन तंत्रज्ञानाचा वापर-

तंत्रज्ञानाधिष्ठीतन व माहिती युगात तर चळवळींचे स्वरूप आणखीनच बदलल्याचे दिसून येते. तंत्रज्ञानाचा आधारघेत या चळवळी/ सेवाभावी संस्थांनी विकेंद्रित, प्रभावी, फिरते नेतृत्व आणि पारदर्शी संरचनांचा पुरस्कार केला आहे. अधिकाधिक सहभाग आणि प्रत्यक्ष सहभागाला

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

प्राधान्य यातून मिळालेले आहे. 'नवा मध्यम वर्ग' हा याचळवळींचा वाहक बनत आहे. अकॅडेमिक क्षेत्र, विध्यार्थी, सेवाक्षेत्र, गृहिणी, पत्रकार यांचा समावेश या वर्गात होतो. सामाजिक प्रश्नांविषयी कळवळ असणाऱ्या व्यक्ती, मग त्या कोणत्याही वर्गातील असो, एकत्र येऊन या चळवळी पुढे नेत आहेत. उदा. पर्यावरण वादी चळवळ यात विद्यार्थी, तरुण, गृहिणी, निवृत्त व्यक्ती यासारखे परिघावरील लोक यांचा सहभाग यात आहे. इंटरनेटच्या प्रभावीपण आभासी माध्यमांची यात बरीच मदत होताना दिसते. ब्लॉग, फेसबुक, लिंक्ड - इन, ट्विटर, व्हाट्सअँप इत्यादींचा यात मोलाचा वाटा दिसून येतो. यांच्यामुळे या चळवळी अधिकच आश्वासक आणि आशावादी वाटू लागल्या आहेत.

**सारांश -**

अलीकडे राज्याची कल्याणकारी भूमिका हळूहळू मर्यादित होत आहे. सेवा उपलब्ध करून द्यायच्या पण सामाजिक-आर्थिक पुनर्रचनेत पडायचे नाही अशी काहीशी भूमिका राज्य घेताना दिसते. यातूनच राज्याबरोबरच बाजारपेठ आणि जागतिक भांडवलशाहीचा प्रभाव आणखीनच वाढणार आहे. याबदलत्या परिस्थितीचे भान चळवळींना येणं अपेक्षित आहे. नागरी समाज आणि राज्य यांचे नाते काय असावे याचे भान असल्याशिवाय चळवळींना समाज परिवर्तनाच्या दिशेने जाता  येणार नाही. कधी राज्याच्या विरोधात तर कधी राज्याबरोबर राहून चळवळींना आपला प्रवास करणे गरजेचे आहे. अनेक चळवळी प्रसार माध्यमांचा आधार घेताना दिसतात. काही तर प्रसार माध्यमांवर गाजत आहेत. पण यातून प्रसार माध्यमांनी उडवलेला धुराळा खाली बसल्यावर काय हाती लागते? याचा मागोवा घेणं क्रमप्राप्त ठरतं. नाही तर याच ळवळींची अवस्थादेखील अलीकडे निघालेल्या मराठा, दलित, ओबीसी तसेच बहुजन सन्मान मोर्चा सारखी दखलन घेतल्यासारखी होईल. चळवळी, स्वयंसेवी संस्था, आंदोलने, मोर्चे, यांकडे पाहण्याचा राज्यसंस्थेचा दृष्टिकोन नेहमीच नकारात्मक राहिला आहे. पुढे तीच परंपरा कायम राहण्याची शक्यता आहे. सामाजिक चळवळींनी साधनांप्रमाणे साध्याच्याही विचारावर भर,

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**विविध चळवळींशी संवाद, सहकार्य गरज पडल्या सत्यांच्या सोबत आघाड्या करणं आणि बदलते सामाजिक –राजकीय स्वरूपयांच आकलन ठेवल्यास चळवळींना पुढील वाट सापडू शकेल.**

**संदर्भ** :

*Shah Ghanshyam, Social Movements in India,(२००४)*

*यादव योगेंद्र, पळशीकर सुहास, डिसुझा पीटर, 'लोकशाही जिंदाबाद', समकालीन प्रकाशन, पुणे, (२०१०)*

*कुंभार नागोराव (संपा.),'विचार शलाका',सामाजिक चळवळी विशेषांक) (२०१६)*

*पळशीकर सुहास,' राजकारणाचा ताळेबंद', (२०१३)*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*